भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/१०/२०१७

**१) घरातील सोन्याचे दागीन्याची चोरी . :–**

दिनांक १३+१४/१०/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी विश्वनाथ मांगो सव्वालाखे वय ४५ वर्ष, रा. मांडेश्वर व फिर्यादीचा भाऊ केशव मांगो सव्वालाखे हे एकाच घरी आपआपले कुटुंबासह वेगवेगळया खोलीत राहतात फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ हे आपले घरी झोपले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मागील दाराची कडी तोडुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे लोंखडी आलमारी मधुन ०१ सोन्याची डागी नथ जुनी वजन ०७ ग्रॅम, ०१ ग्रॅम सोन्याची अंगठी वजन ०५ ग्रॅम, ०१ सोन्याचा गोप वजन १० ग्रॅम, ०१ सोन्याची गरसोली लाख असलेली वजन १० ग्रॅम, ०१ सोन्याची अंगठी वजन ०५ ग्रॅम, व नगदी ५०,०००/'रु. असा एकुण १ लाख ३७ हजार /–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**२) सोन्या, चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक १३+१४/१०/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी अनिकलाल कंटी गराडे वय ३६ वर्ष, रा. मांडेश्वर व त्याचेच मोहल्यातील विठ्ठल मारोती सव्वालाखे वय ६५ वर्ष, रा. मांडेश्वर यांचे घराचे मागील दाराचा अज्ञात चोरटयाने कोंडा तोडुन आत प्रवेश करुन फिर्यादी व विठ्ठल सव्वालाखे यांचे घरातील आलमारीतुन व पेटीतुन फिर्यादीचे १२ ग्रॅम सोन्याच्या बिऱ्या, ३ ग्रॅम सोन्याचे झाले, ५ ग्रॅम, सोन्याचे मनी डोरले व नाकातील १ सोन्याचे बेसर, १० तोडे चांदीचा कळदोडा, १० तोडे चांदीच्या २ अंगठया, ३० तोडे चांदीच्या पाय पट्टया ३ जोड, चांदीचे ३९ नग सिक्के व नगदी १०,०००/–रु. असा एकुण ५३,५००/–रु. तसेच विठ्ठल सव्वालाखे यांचे ६ ग्रॅम सोन्याची गाठी, १२ तोडे चांदीच्या पायपट्टया १ जोड, २ तोळे चांदीचे जोळवे, व नगदी २,०००/–रु. असा एकुण १५,८००/–रु. चा माल दोन्ही माल मिळुन ३९,३००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पिडीत अल्पवयीन मुलगी ही तिचे राहते घराचे मागे लघु शंकेकरीता गेली असता यातील आरोपीने तिचा हात पकडुन तु माझ्याशी बोल असे म्हणुन ओढुन तिला थापडाने मारहान करुन तिच्या अंगावरील कपडे फाडल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,३५४(ब) भांदवि. सहकलम ८ बाल लैगिंक अधीनियम. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**४) मारोती कारचे धडकेत एक जखमी :–**

दिनांक १३/१०/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील जखमी बाबुराव महादेव ढोगे वय ५० वर्ष, रा. खैरी तेलोता हा शौचास त्याचे शेताजवळ डांबरी रोडने बाजुला बसला असता समोरुन येणाऱ्या रंगाचे मारोती कार चालकाने त्याचे ताब्यातील गाडी हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन जखमीचे उजव्या पायाचे पंज्यावर चालवुन जखमी करुन पळुन गेल्याने फिर्यादी दुधाराम लक्ष्मण मेंदडकर वय ४५ वर्ष, रा. खैरी तेलोता यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

५) आयसर गाडीचे धडकेत स्कुटी चालक जखमी :—

दिनांक १३/१०/२०१७ चे २३.५० वाजता दरम्यान यातील फिर्यादी महेश दंगा सोनवाने वय २४ वर्ष रा. सिंधगवान जि.नंदुरबार ह. मु. सेंदुरवाफा हा तेजराम वाघमारे यांचे सोबत टोल नाक्याकडे स्कुटीने जात असता नागपुर कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन समोरील ट्रकला ओव्हर टेक करीत असतांना फिर्यादी जखमींचे स्कुटी गाडीस धडक मारुन फिर्यादी यांचे उजव्या पायाचे टोंगडयाचे खालुन फॅक्चर झाले असुन तेजराम वाघमारे यांचे डोक्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने डॉक्टरी मेमो व फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

६) मोटार सायकलची डिव्हाडरला धडक लागुन दोन जखमी :—

दिनांक १३/१०/२०१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल वर पंढरी चेटुले वय अंदाजे ६० वर्ष, रा. खराशी यास मागे बसवुन लाखनी कडुन मानेगाव सडक कडे जातांनी आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल ही सर्विस रोडाचे डिव्हायरला धडक मारुन मोटार सायकल सह एनएच ६ रोडवर खाली पडुन स्वत: व मागे बसणारा पंढरी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

७) संगनमत करुन शिवीगाळ करुन ढकलुकल व मारहान केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १३/१०/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी क्रिष्णगोपाल मारोती वलके वय ४० वर्ष, रा. लाखांदुर हा जुना बसस्थानक लाखांदुर येथुन त्याचे घरी परत जात असतांना राजेन्द्र किराणा स्टोअर्स जवळ प्रमोद बगमारे यास खर्रा चार काय चालु आहे? असे बोलला असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तुझी अवकांत काय आहे? असे बोलुन शिवीगाळ करुन ढकलढुकल करुन मारहान केली, त्यामुळे फिर्यादी हा रोडचे बाजुला पडल्याने फिर्यादीचे डोक्यावर, छातीवर मार लागुन जखमी झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

८) संगनमत करुन भांडण करुन स्टिलचे बादलीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १३/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी केशव किसन चौधरी वय ४२ वर्ष, रा. वडेगाव खांबा हा त्याचे घरी रोडने जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ ने तु आमचे पार्टी मधुन दुसऱ्या पार्टीत गेला असे म्हणुन भांडण केले व स्टिलचे बादलीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले व अरोपी क्र. २ नी भांडण करुन थापडाने मारल्याने फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

९) अवैध दारू अंडयावर धाडी . :–

दिनांक १४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, साकोली पालांदुर, पवनी, लाखांदुर येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून १३६ लिटर हातभट्टीदारु+ १०० किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती १५५००/–रु व १६ लिटर २०० मिली देशी/दारु +१ कार + १ मोटार सायकल किंमती ९१५०८०/–रु. असा एकुण ९३,०५८०/रु चा माल जप्त करण्यात आला.

(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.